पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१२/०१०/२०२३
## दि.११/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६९१/२०२३,भादविक ३२३,३२४,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | वीर प्रताप,वय २१ वर्षे,रा.नागपुर चाळ,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०९/१०/२०२३ रोजी रात्रौ २०/०० व दिनांक १०/१०/२०२३ रोजी रात्रौ २०/३० वा.चे दरम्यान वीर पान शॉप सानिया मॉलचे मेन गेटचे बाजूला येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे वीर पान शॉप या पानटपरी नागपुर चाळ येरवडा पुणे येथे बसले असताना,यातील नमुद इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादी यांनी यापुर्वी नमुद इसमांना पाणी बाटली व आवळा सुपारी आणुन दिली नसल्याचा राग मनात धरून,फिर्यादी यांना त्यांचे टपरी मधुन बाहेर काढुन जबरदस्तीने टपरीचे मागे नेवुन लाथा-बुक्क्याने मारहाण करून, त्यांचे कडील लोखंडी कोयत्याने फिर्यादीचे ऊजव्या गुडघ्याचे खाली वार करुन त्यांना जखमी केले. तसेच शिवीगाळ व आरडा-ओरडा करून,पोलीस स्टेशनला तक्रार दिल्यास जीवे सोडणार नाही अशी धमकी देवुन,तेथे जमलेल्या नागरीकांना तुम्ही याठिकाणी थांबु नका,नाहीतर तुम्हाला देखील सोडणार नाही अशी धमकी देवुन,हवेत कोयता फिरवुन दहशत केली त्यामुळे लोकांनी त्यांची दुकाणे बंद करून घेतली होती. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंकुश डोंबाळे ९७६६१३८८३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६९२/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६८ वर्षे,रा.सर्वे नं.१२,लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | १.मोहम्मद ऊर्फ रहिम रेहमान शेख,वय-२३ वर्षे,रा.सर्वे नं.१२,लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे २.इमरान रेहमान शेख,वय-२० वर्षे,रा.सदर (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/१०/२०२३ रोजी रात्री ०१/३० वा.संतोष मित्र मंडळ,लक्ष्मीनगर,येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे रिक्षा चालक असुन,ते त्यांचे राहते घरामध्ये झोपले असताना,त्यांचे घरा शेजारी राहणारे यातील नमुद इसमांनी दारु पिवुन आपसात भांडण करीत असताना,त्यानी फिर्यादीचे घरा समोरील पाण्याचा टब फोडला. त्यावेळी त्यांनी त्याचा जाब विचारल्याचे कारणावरून फिर्यादीस शिवीगाळ करून त्यांना धक्का-बुक्की केली. त्यानंतर पोलीसांत तक्रार करण्यासाठी फिर्यादी हे निघाले असता त्यांनी त्यांचेकडील धारधार हत्याराने फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उददेशाने त्यांचे डोक्यात वार करुन,त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच त्यांचे मदतीसाठी आलेल्या नागरीकांना इसको बचाने कोई आया तो,उसको भी काट डालेंगे असे बोलुन,त्यांचे हातातील कोयते हवेत फिरवुन,सदर परिसरात दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, जमदाडे ९५५२५१५२३८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १७५/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-६० वर्षे,रा.लॉ कॉलेज रोड,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०९/२०२३ रोजी २०/३० वा.मराठवाडा कॉलेजच्या समोर बीएमसीसी रोडवर डेक्कन, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी चालत जात असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चेन ८९,०००/- रु किची जबरी चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. महेश भोसले ९८५०१५११०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ३३०/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | अब्दुल अहमद,वय २५ वर्षे,रा.केशवनगर,मुंढवा,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/१०/२०२३ रोजी ११/३० वा. ते दि.०४/१०/२०२३ रोजी १६/०० वा.चे दरम्यान स.नं.०५, किशोर मेडिकल लेन,केशवनगर,मुंढवा पुणे येथील राहते घरा मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील ६,००,०००/- रुपये रोख रक्कम घरफोडी चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धनंजय गाडे ८६०५५२५३९४ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे ३३१/२०२३,भादविक ३२६,३२३,४२७,५०४,५०६,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-२२ वर्षे,रा.केशवनगर,मुंढवा,पुणे |
| **आरोपीत** | १.एक इसम व त्याचे आई-वडील तसेच एक अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १०/१०/२०२३ रोजी १०/३० वा.श्रीकृपा सोसायटीचे मागील बाजुस गायकवाड वस्ती, केशवनगर,मुंढवा,पुणे ते गुरूकृपा सोसायटीकडे जाणारे रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे वडील,भाऊ प्रथमेश याचेसह आ.क्र.१ याचे घरी जावुन त्याचे आई-वडील यांना तुमचा मुलगा आमचे नातेवाईक मुलीला फसवत आहे असे समजावुन सांगत असताना,त्यांनी फिर्यादी यांचेशी वाद घालुन भांडणे करण्यास सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादी हे त्यांचे घराचे बाहेर येवुन गुरुकृपा सोसायटी येथे घरी जात असताना गायकवाड वस्ती येथील रोडवर आलो असताना,सदर इसम व इतरांनी फिर्यादीचे पाठीमागुन येवुन आ.क्र.१ याने कसल्यातरी लोंखडी धारदार वस्तुने फिर्यादीचे डोक्यात,मानेवर,डावे हातावर मारुन त्यांना गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादी यांचे वडीलांचे डोक्यात काचेची बाटली मारुन त्यांना शिवीगाळ करुन लाथा-बुक्यांनी मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी यांची मोटार सायकल हिचेवर दगड मारुन नुकसान करुन,तेथेच असलेली कार ही घेवुन त्यांचे अंगावर घालण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. धनंजय गाडे ८६०५५२५३९४ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३१८/२०२३,भादविक ३१८ |
| **फिर्यादी** | अनिल मन्हाळकर, पोलीस अंमलदार, येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | अज्ञात व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/१०/२०२३ रोजी सकाळी ०९/०५ वा.चे पुर्वी पांडु लमाण वस्ती,शंकर मंदिराच्या समोरील कटयावर,येरवडा,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे लक्ष्मीनगर पोलीस चौकी येथे मार्शल कर्तव्यावर असताना,वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अनैत्तिक संबंधातुन किंवा संबंधातुन नुकतेच जन्मलेले नवजात अंदाजे ०४ महिन्याचे मयत अर्भक त्याचा (मृत वा जिवंत) जन्म झाला हे लपविण्याचे व परस्पर विल्हेवाट लावण्याचे उद्देशाने,त्यास सांभाळण्यास असमर्थता दाखवुन, त्याचे पालकत्वाची जबाबदारी न स्विकारता,त्या अर्भकाचा जन्म झाल्याचे उद्देशपुर्वक लपवुन ठेवण्यासाठी त्यास प्लास्टीकच्या पिशवीत उघडयावर टाकुन निघुन गेली,म्हणुन सदर अज्ञात व्यक्ती विरूध्द गुन्हा दाखल. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. स्वप्नील पाटील ९९७५६३३७०३ |
| ७ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १७६/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-७२ वर्ष,रा.शास्त्रीनगर कोथरूड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/१०/२०२३ रोजी १६/३० वा ते १७/१५ वा.चे दरम्यान जीपीओ पोस्ट ऑफिस बस स्टॉप पुणे ते गरवारे कॉलेज कर्वेरोड,पुणे पीएमपीएमएल बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे नकळत त्यांचे उजवे हातातील सोन्याची बांगडी ५५,०००/- रु किमतीची काढुन चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. दत्तात्रय सावंत ९०२१९२१०२२ |
| ८ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ५२६/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय-७२ वर्ष,रा.खराडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ११/१०/२०२३ रोजी ०९/३० वा.वाघोली ते कात्रज या बसने खराडी बायपास ते स्वारगेट पुणे पी.एम.पी.एम.एल.बस मधुन प्रवास करीत असताना,टाटागार्ड रुम बस स्टॉप, नगर रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मनपा पीएमपीएमएल बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे पायजम्याचा खिसा कापुन,सदर खिशातील ५०,०००/- रुपये रोख रक्कम चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. आर.व्हि.वारंगुळे ०२०/२५६३३८८८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**